किशोर
# ज्ञानप्रकाश
शैक्षणिक वार्तापत्र
मे २०२६



प्रकल्पातील केळीच्या घडाची मिरवणूक

वर्ष २६ वे | संपादक : सतीश नरहरे | अंक : ८२ वा

## संपादकीय...
### वाचन एक संस्कार...

वाचन हा संस्कार मानला तर तो एकदा करून चालणार नाही. शारीरिक वाढ आणि बौद्धिक विकासाच्या वयात सातत्याने मुलांसमोर विविध प्रकारची पुस्तके, रंगीत चित्रे आणि मजकूर कमी असणारी पुस्तके ठेवावी लागतात. मूल स्वतः वाचू लागेल तेव्हाच पुस्तक देऊ हा पवित्रा घेतला तर फार उशीर होईल कदाचित. अगदी मूल जन्माला येण्याआधीपासून हा संस्कार होऊ शकतो. मूल घरात वाढत असताना त्याला घरात कोणीतरी वरचेवर पुस्तक वाचताना दिसले तर त्याला तू वाच म्हणण्याची गरजच पडणार नाही. अलीकडे आपण मोठी मंडळीच वाचत नाही. तेव्हा मुलं वाचत नाहीत असे म्हणण्याचा अधिकार आपण गमावून बसतो. पालक आणि शिक्षक दोघांनी आपले प्रयत्न सातत्याने करत राहिल्यास नक्कीच मुलं वाचायला लागतील. त्यासाठी महत्त्वाचे ठरते ते पुस्तकांची निवड करणं. त्या त्या वयोगटाचा विचार करून, आवड निर्माण करणारी पुस्तके वाचायला मिळायला हवीत . पुढे मुले मोठी होतात तशी त्यांना साहसी कथा, रहस्य कथा आवडतात. त्याही पुढे मुलांची सत्यघटनेवर आधारित असलेल्या पुस्तकांची निवड वाढत जाते.

पुस्तकांकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोनही तेवढाच महत्त्वाचा ठरतो . "पुस्तक वाच आणि प्रेरणा घे" "काय शिकलास त्या पुस्तकातून?" असे प्रश्न पुस्तकांकडे जाणाऱ्या पायात जणू बेड्या घालतात . पेरलेली प्रत्येक गोष्ट उगवते, त्याच प्रमाणे वाचलेल्या प्रत्येक पुस्तकाचा परिणाम वाचणाऱ्यावर होतच असतो. फक्त हवा असतो संयम.

केलेले वाचन स्वस्थ बसू देत नाही. वाचनामुळे विचारांची दिशा बदलते , भूतकाळात झालेल्या चुका भविष्यात होऊ नयेत याची जाणीव निर्माण होते. तसेच व्यक्ती म्हणून स्वतंत्र व स्पष्ट विचारांची मुले घडतात. व्यक्तिमत्वात ठामपणा येतो. ही वाचणारी मुलं अन्याय सहन करणार, नाहीत तशीच अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी बनतील.

अलीकडे आई - वडील दोघेही कामात व्यग्र असल्याने मुले घरात एकटी असतात. त्यांचा एकटेपणा हा पुस्तकांच्या सानिध्यात एकटेपणा राहणार नाही . यावेळेपर्यंत आवड निर्माण झाली तर नक्कीच मूल सतत शोध घेत राहील. वाचत राहील.

मोठ्या व्यक्तीमत्वांची चरित्रे , त्यांचे अनुभव आणि जीवनप्रवास वाचून अनेकांची आयुष्य घडली आहेत .वाचणाऱ्या पिढीतून देशासाठी खंबीर नेतृत्व निर्माण होईल.

पान २ वर...

## कठिण काळ आणि आव्हानेच उत्तम नेतृत्त्व घडवतात...



ज्ञानप्रकाशचा माजी विद्यार्थी सिद्धांत नरहरे याने त्याच्यासोबत अमेरिकेतील प्रसिद्ध अशा बॅबसन कॉलेजमध्ये शिकणारे' (Babson College) विद्यार्थी हृदय मुनोथ (बेंगलोर), नेहा असवानी (पुणे) यांना प्रकल्पास भेटीसाठी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रित केले होते. करिअर, उद्योजकता आणि मानसिक स्वास्थ्य या विषयांवर कार्यशाळेच्या माध्यमातून त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

गेल्या ३० वर्षांपासून उद्योजकता (Entrepreneurship) शिक्षणामध्ये जगात प्रथम क्रमांकावर आणि अमेरिकेत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या प्रतिष्ठित 'बॅबसन कॉलेज'च्या या विद्यार्थ्यांनी आपले अनुभव ज्ञानप्रकाशच्या विद्यार्थ्यांसमोर मांडले. या भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर विचार करण्यास प्रवृत्त करणे हा होता. हृदय आणि नेहा यांनी आपले जागतिक स्तरावरील अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. भारतीय आणि अमेरिकेतील शिक्षण पद्धती यामध्ये जाणवलेला फरकही त्यांनी स्पष्ट केला. विद्यार्थ्यांनी आता केवळ पारंपरिक करिअर पर्यायांचा विचार न करता, 'ग्लोबल माइंडसेट' (जागतिक दृष्टिकोन) ठेवणे किती गरजेचे आहे, हे पटवून दिले.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, "येणाऱ्या काळात केवळ पदव्या घेणारे विद्यार्थी यशस्वी होणार नाहीत, तर जे विद्यार्थी समाजातील समस्या सोडवू शकतील (Problem Solvers), तेच खऱ्या

पान २ वर...

## मूल घडवणं ही एक साधनाच
**तृप्ती अंधारे** -शिक्षणाधिकारी, लातूर



नवनिर्मितीच्या व सृजनाच्या वाटेवर मुलांचा शिकण्याचा प्रवास अधिक आनंददायी व्हावा यासाठी ज्ञानप्रकाश मध्ये सातत्याने वेगवेगळे उपक्रम होतात. याचाच एक भाग म्हणजे ज्ञानप्रकाशचा सृजनानंद महोत्सव...

दि. २४ जानेवारी रोजी "सृजनानंद महोत्सव" प्रकल्प प्रदर्शनाचे उद्घाटन जि. प. प्राथमिक विभाग शिक्षणाधिकारी मा. तृप्ती अंधारे व माजी सहाय्यक आयकर आयुक्त मा यशवंत तांदळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी "बाबा आमटे सामाजिक समरसता राष्ट्रीय पुरस्कार" प्राप्त झाल्याबद्दल अंनीस महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष व प्रकल्पाचे स्नेही श्री माधव बावगे सर यांचा प्रकल्पाच्या वतीने करण्यात आला.

मा. यशवंत तांदळे यांनी मुलांच्या प्रकल्पाचे कौतुक केले व ज्ञानप्रकाशच्या कार्यपद्धतीची प्रशंसा केली.

मा. तृप्ती अंधारे म्हणाल्या की ज्ञानप्रकाश हा माणसं घडवणारा , माणसं उभी करणारा आणि माणसं जोडणारा सृजनशील प्रकल्प आहे. स्वतःची वेगळी ओळख असलेल्या ज्ञानप्रकाशमध्ये आपली मुलं घडत आहेत त्यामुळे आपण सर्व भाग्यवान पालक आहात असेही त्या पालकांशी बोलताना म्हणाल्या.

मुलांशी संवाद साधणं, मुलांना वेळ देणं यातून मुलं घडत जातात आणि मूल घडवणं ही एक साधनाच आहे. असा मोलाचा संदेश त्यांनी पालकांना दिला.

## दृष्टी आहे तर सृष्टी आहे -डॉ. राम पाटील

प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण कार्यक्रमासाठी प्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. राम पाटील तसेच नरहरे क्लासेसचे माजी विद्यार्थी डॉ. अभय देशपांडे व डॉ. गणेश नरवडे उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रभागातील नवनिर्वाचित नगरसेवक मा. बाळासाहेब देशमुख , मा आयुब मनियार, मा .दत्ता सोमवंशी वमा. अमोल लांडगे यांचा प्रकल्पाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. राम पाटील प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देताना म्हणाले, "दृष्टी आहे तर सृष्टी आहे." यासाठी डोळ्यांची काळजी घेणे तसेच स्वच्छता राखणे आवश्यक आहे. हे सांगताना त्यांनी शाळेच्या विविध उपक्रमांचे कौतुकही केले.

नरहरे क्लासेसचे माजी विद्यार्थी डॉ. अभय देशपांडे यांनी नरहरे क्लासेसमधील काही आठवणींना उजाळा दिला . डॉ. गणेश नरवडे यांनी गणित पक्के असेल तर आयुष्याचे गणित पक्के होते आणि माझे गणित आदरणीय नरहरे सरांमुळेच पक्के झाले. आज मी जे काही घडलो ते सरांमुळेच घडलो अशा भावना व्यक्त केल्या.

प्रजासत्ताक दिनाच्या भरगच्च कार्यक्रमात इयत्ता १ ली ते ९ वीच्या मुलांनी कवायतीच्या विविध प्रकारांचे सादरीकरण केले व ३री ४थी च्या कब बुलबुले शिस्तबद्ध परेड केली. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने पालकांची उपस्थिती होती; तसेच विद्यार्थी, शिक्षक व परिसरातील जेष्ठ नागरिकही उपस्थित होते.



## स्वप्न पहा आणि ते पूर्ण करण्यासाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न करा -दिपक करंजीकर



प्रसिद्ध लेखक अर्थतज्ञ व आंतरराष्ट्रीय व्यवस्थापक तज्ञ श्री दिपक करंजीकर यांनी जागतिक स्पर्धेची ओळख व्हावी, तसेच मुलांच्या करिअरला योग्य दिशा मिळावी या दृष्टीने ज्ञानप्रकाश मधील मुलांशी संवाद साधला.

12 जानेवारी स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील काही प्रसंग सांगितले.

पूर्वीच्या काळापेक्षा आजचे युग प्रगत आहे. लोक कल्याणासाठी जे काही करायचे आहे ते ९ वी १० वी हा वयोगटात अतिशय ताकतीचा असतो. यासाठी फक्त स्वतः मधली ताकद ओळखली पाहिजे. ज्ञानाचा प्रकाश प्रत्येकाच्या आत असतो स्वप्न पहा आणि ते पूर्ण करण्यासाठी परीश्रमपूर्वक प्रयत्न करा लांब जायचे असेल तर गती वाढवावीच लागते. असा मोलाचा संदेशही त्यांनी यावेळी मुलांना दिला

# शालेय काळातील बक्षिसे जीवनाला दृष्टी मिळवून देतात...




**डॉ. शिवाजीराव जवळगेकर**
(मनपा स्विकृत सदस्य)

लर्निंग होम विभागात विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. विविध स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देऊन कौतुक करण्यात आले.या कार्यक्रमासाठी मनपा, लातूरचे स्वीकृत नगरसेवक, मा. श्री. डॉ. शिवाजीराव जवळगेकर, जेष्ठ साहित्यिक मा. श्री. भारत सातपुते, सेवानिवृत्त प्राध्यापक मा. श्री. शिरीष दिवेकर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्रकल्पप्रमुख सतीश नरहरे यांनी पाहुण्यांचा सामाजिक व साहित्यिक परिचय करून दिला. 11 एप्रिल पासून सुरू होणाऱ्या silent reading या वाचन कट्ट्याचे उद्घाटन मा. श्री. सातपुते सरांनी शुभेच्छा देऊन केले. ते म्हणाले की, ज्ञानप्रकाश हे एक बालकांबरोबरच पालकांना घडवणारे गुरुकुल आहे. मुलांना वाचन व लेखन वाढवण्यासाठी तसेच ध्येय गाठण्यासाठी येथे जाणीवपूर्वक प्रोत्साहन दिले जाते.

मुलांना मार्गदर्शन करताना डॉ. जवळगेकर म्हणाले की, ज्ञानप्रकाश मध्ये विद्यार्थीदशेपासूनच सामाजिक भान पेरण्याचे काम होते. येथील शिक्षक कुटुंबाप्रमाणे सेवा देतात ही उल्लेखनीय गोष्ट आहे. स्पर्धेची मिळालेली बक्षिसे ही जीवनाला दृष्टी देणारी, विज्ञानाची दिशा दाखवणारी असतात. ज्ञानप्रकाशमधून भावी कलाकार, पत्रकार, चित्रकार, शास्त्रज्ञ तसेच कलावंतही निर्माण होतील असे श्री. शिरीष दिवेकर म्हणाले.

# ज्ञानप्रकाशमधून होतोय संस्कारांचा जागर...

**-नगरसेविका रागिणी यादव**



विद्यानिकेतन विभागाच्या क्रीडा महोत्सवातील बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लातूर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेविका रागिणीताई यादव यांची उपस्थिती होती.

रागीणीताईंच्या हस्ते क्रीडामहोत्सवाचे बक्षिस वितरण करण्यात आले. यावेळी मुलांनी प्रार्थना आणि उत्साहगीतं सादर केली.

मुलांनी गायलेली प्रार्थना व गीते ऐकून त्या म्हणाल्या की ज्ञानप्रकाश मध्ये संस्कृती व संस्कार यांचा जागर झाला व "मला माऊलींचे दर्शन झाल्यासारखे वाटले" नगरसेविका यांनी सर्व मुलांची अभिनंदन केले. मुलांनी रागिणीताईंना त्यांचे बालपण, शिक्षण, काम याविषयी अनेक प्रश्न विचारले, त्यांनी समजतील अशा समर्पक भाषेत सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. मुलांचे प्रश्न ऐकून राष्ट्राचे भविष्य सुरक्षित हातात आहे हे पाहून आनंद वाटला असेही त्या म्हणाल्या.

# वाचन एक संस्कार

...पान १ वरून

ज्ञानप्रकाश मध्ये मागील २५ वर्षांपासून मुलांचे वाचन वाढावे यासाठी प्रयत्न होत आहेत. यासाठी प्रकट वाचन हा आम्ही केलेला प्रयोग यशस्वी झाला आहे. प्रत्येक वर्गासाठी पुस्तक निवडून त्याचे वर्गात वाचन केल्याने मुलांचा भावनिक विकास होतो हे लक्षात आले आणि सातत्याने हा प्रयोग करण्याचे ठरवले. त्यापुढील पायरी म्हणजे मुले शिक्षकांना कोणते पुस्तक वाचू ? असे विचारायला लागली. वर्गात वाचलेले पुस्तक मुलांकडून घरी पोचायचे. आणि पालकही अशा पुस्तकांबद्दल आपल्या प्रतिक्रिया आमच्यापर्यंत पोचवायचे.

ज्ञानप्रकाशच्या पालक व विद्यार्थ्यांना पुस्तक प्रदर्शनातून दर्जेदार आणि निवडक पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. मध्यंतरी कोवीड काळात शाळा बंद होती पण आमचे वाचन थांबले नाही. मुलांसाठी शाळेने वार्षिक वर्गणी भरली आणि वर्षभर पुस्तके दिली. पुस्तक वाचनाच्या audio clip पालकांच्या गटात टाकल्या. ज्या कुटुंबातील सर्वांनी ऐकल्या.

एकूणच वाचन हा मनावर होणारा संस्कारच आहे. ती सवय झाली तर नक्कीच मूल सतत नाविण्याचा शोध घेत राहील . आत्मबल वाढविणारे हे टॉनिक आपल्या मुलांना पालक म्हणून दिलेच पाहिजे. या भावनेतून ज्ञानप्रकाशने महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या एप्रिल महिन्यातील जयंतीचे औचित्य साधून **'मिशन सायलेंट रिडिंग'** सुरू केले. महिन्यातील दुसरा आणि चौथा शनिवार प्रकल्पात येऊन पालकांनी फक्त आणि फक्त वाचन करावे यासाठी निसर्गरम्य वातावरणात व्यवस्था केली आहे. या काळात मानसिक स्थैर्य प्राप्त असणारी, वाचणारी कुटुंबं तयार झाली पाहिजेत ज्ञानप्रकाशची अशी भूमिका राहिली आहे.

आता फक्त आपण वेळ काढून वाचायला येण्याची आम्ही वाट पाहत आहोत.

**सविता नरहरे**
संचालिका व मुख्याध्यापिका
ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प,
लातूर

# कठोर परिश्रम करा, सतत अद्ययावत रहा...

**डॉ. राहुल भालके, रूबी हॉस्पिटल पुणे**

रूबी हॉस्पिटल पुणे येथील भुलतज्ञ डॉ. राहुल भालके, लातूर येथील मानसोपचार तज्ञ डॉ. अरविंद कराड तसेच लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रा डॉ. मारोती कराळे तसेच स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रशांत खंडागळे, यांनी मुलांशी संवाद साधला.

डॉ. राहुल भालके यांनी त्यांच्या दैनंदिन कार्यपद्धतीविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. डॉक्टर म्हणून काम करताना येणाऱ्या जबाबदाऱ्या आणि समाजसेवेचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. प्रशांत खंडागळे यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. मनात काही करण्याची जिद्द असेल तर यश नक्की मिळते. विद्यार्थ्यांना स्वतःवर विश्वास ठेवण्याचा, सकारात्मक राहण्याचा आणि आपल्या आवडीच्या क्षेत्रात मनापासून मेहनत करण्याचा सल्ला दिला. तसेच आपल्या प्रगतीत मदत करणाऱ्या चांगल्या मित्रांशी संगत ठेवा, हे सर्व करत असताना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्यास सुचवले.

डॉक्टर होण्यासाठी कठोर परिश्रम आणि सतत अद्ययावत राहणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. डॉ. अरविंद कराड यांनी विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी Psychiatrist आणि Psychologist यांतील फरक समजावून सांगितला. ताणतणाव कमी करण्यासाठी संवाद आणि स्वतःच्या भावना शेअरिंग करणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

आई-वडिलांजवळ मन मोकळे करा, रागावर नियंत्रण ठेवा, नियमित व्यायाम आणि मैदानी खेळ खेळा असा सल्ला दिला. अभ्यासात सातत्य ठेवणे, वेळेचे नियोजन करणे आणि मोबाईलचा वापर कमी करणे यावर त्यांनी विशेष भर दिला. डॉ. मारोती कराळे म्हणाले आम्हा सर्वांचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले आहे. तुम्ही कोणताही न्युनगंड न बाळगता प्रयत्नशील राहून यशस्वी व्हा, अशा शुभेच्छा दिल्या.



# उधळण नवरसांची - सांस्कृतिक महोत्सव




लर्निंग होम विभागातील इयत्ता ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी 'उधळण नवरसांची' या सांस्कृतिक महोत्सवात आपल्या दमदार सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जागृती शुगरचे मॅनेजिंग डायरेक्टर श्रीगणेश येवले यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले . मानवी विकासामध्ये बौद्धिक प्रगती साधत असताना , भावनात्मक विकास हा देखील व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग मानला जातो. जीवन जगत असताना क्षणोक्षणी बदलणाऱ्या भावनांचा समतोल साधणे म्हणजे खरे शिक्षण. कला हे मानवी भावनांच्या अभिव्यक्तीचे (Expression) सर्वात सशक्त माध्यम आहे. नवरसांच्या माध्यमातून जेव्हा विद्यार्थी व्यक्त होतात, तेव्हा त्यांची संवेदनशीलता वाढण्यास मदत होते आणि हीच संवेदनशीलता एका सुजाण व प्रगल्भ समाजाच्या निर्मितीसाठी आवश्यक असते, हा मौलिक विचार यावर्षीच्या सादरीकरणातून अधोरेखित झाला .मानवी भावनांच्या अभिव्यक्तीचे सर्वोच्च माध्यम म्हणजे कला. मुलांनी विविध नृत्य आणि नाटकांतून नवरसांचे पैलू रंगमंचावर उलगडले. श्रृंगार, हास्य, वीर, रौद्र, भयानक, बिभत्स, अद्भुत, शांत आणि करुण या नवरसांवर आधारित कलाविष्कारांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले. जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन माणूस म्हणून एकमेकांना समजून घेण्यासाठी नवरसांची ओळख असणे महत्त्वाचे आहे.

# कठीण काळ आणि आव्हानेच उत्तम नेतृत्त्व घडवतात

...पान १ वरून

अर्थाने प्रगती करतील. समस्या सोडवण्याची ही वृत्तीच तुम्हाला भविष्यात आर्थिक स्थैर्य आणि सर्वांगीण विकास (Holistic & Financial Growth) मिळवून देणार आहे. यासाठी तुमच्यातील सृजनशीलता (Creativity) जपणे आणि तिचा वापर समस्यांवर उपाय शोधण्यासाठी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

उद्योजकतेची नवी व्याख्या मांडताना त्यांनी स्पष्ट केले की, "उद्योजकता (Entrepreneurship) म्हणजे केवळ एखादा व्यवसाय सुरू करणे किंवा 'जॉब' करणे नव्हे. तर ती एक विचारसरणी (Mindset) आहे. समाजातील लोकांचे दुःख, वेदना (Pain points) आणि गरजा आणि अडचणी समजून घेऊन, त्यावर शाश्वत उपाय शोधणे म्हणजेच खरी उद्योजकता होय."

कठीण काळ आणि आव्हानेच उत्तम नेतृत्व आणि व्यक्तिमत्व घडवतात," हा विचार मुलांसमोर मांडला. केवळ सामूहिक सत्रच नाही तर त्यानंतर झालेल्या वैयक्तिक सत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले प्रश्न, शंका आणि वैयक्तिक समस्या मोकळेपणाने मांडल्या. शाळेच्या स्तरावर अशा प्रकारचे प्रयोगशील (Experimental) आणि थेट संवादाचे सत्र आयोजित करण्यात ज्ञानप्रकाशने पुढाकार घेतला याबद्दल प्रकल्पाची भूमिका अतिशय उत्कृष्ट आहे असे यावेळी समुपदेशक नेहा असवानी म्हणाली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना करिअर आणि व्यक्तिमत्व जडणघडणीची एक नवी दिशा मिळाली. परदेशातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनुभव ऐकून मुलांच्या मनावर सकारात्मक परिणाम दिसून आला.

# शोध घ्या, संशोधक व्हाल -डॉ.विवेक सौताडेकर

ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात आपला महाराष्ट्र समजून घेऊया या तीन दिवसीय उपक्रमाचे उद्घाटन इतिहास संशोधक, लेखक, व्याख्याते, प्रख्यात निवेदक, डॉ. विवेक सौताडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्र दिनानिमित्त प्रकल्पात 29 , 30 एप्रिल आणि 1 मे या तीन दिवसीय प्रदर्शनात इयत्ता 5 वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांनी आपला महाराष्ट्र समजून घेण्यासाठी अनेक विषयांची मांडणी केली . यावेळी उद्घाटक डॉ. सौताडेकर म्हणाले आपण ज्या भूमीत राहतो त्याचा इतिहास ,भूगोल, सांस्कृतिक, सामाजिक ,राजकीय, साहित्यिक वारसा समजून घेणे आपले आद्य कर्तव्यच आहे, आणि ते ज्ञानप्रकाशची मुलं या प्रदर्शनातून करत आहेत हे पाहून कौतुक वाटले. महाराष्ट्राची परंपरा व संस्कृतीचे दर्शन यातून होत आहे. आपल्या लातूरलाही पन्नास हजार वर्षांचा इतिहास लाभला आहे. तुम्ही शोध घेतला तर संशोधक वृत्ती वाढते आणि यातूनच संशोधक घडतील.

डॉ. सौताडेकर यांच्या प्रभावी वक्तृत्वाने विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले त्यावेळी विविध गीतांची सलामी विद्यार्थ्यांनी त्यांना दिली.

विद्यार्थ्यांनी स्वतः निवडलेल्या विषयाची मांडणी करण्यासाठी शोध घेऊन अधिक खोलात जाऊन आपला महाराष्ट्र समजून घ्यावा या उद्देशाने या प्रदर्शनाची संकल्पना आकारास आली.

तीन दिवसीय प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी आपले सण -उत्सव, संत परंपरा, पर्यटनस्थळे, गडकिल्ले, धरणे, साहित्य, प्रादेशिक विभाग, समाजसुधारक, ऐतिहासिक वास्तू, क्रांतिकारक, शिल्पे, विद्यापीठ, विधानभवन इत्यादी विषयांची अभ्यासपूर्वक मांडणी केली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांवर हिंदी विषयात मिळवलेल्या डॉक्टरेट पदवी बद्दल प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे यांनी डॉ. सौताडेकर यांचा सत्कार केला.



# चला संशोधनाकडे वळूया !

विद्यार्थ्यांचा चौकस व व्यापक दृष्टिकोन विकसित व्हावा तसेच संशोधनाकडे करिअर म्हणून पाहण्याची प्रेरणा मुलांना मिळावी या उद्देशाने विज्ञान दिनानिमित्त विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून मराठी विज्ञान परिषदचे डॉ. संतोष कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी त्यांनी ८वी ,९वीच्या विद्यार्थ्यांना 'चला संशोधनाकडे वळूया' या अंतर्गत संशोधन म्हणजे सत्याचा सतत शोध घेण्याचा संघटित प्रयत्न असल्याचे सांगितले .कोणत्याही क्षेत्रात कार्य करताना संशोधनाची वृत्ती जोपासणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

थॉमस अल्वा एडिसन, आयझॅक न्यूटन, निकोलस कोपरनिकस आणि अल्बर्ट आईन्स्टाईन यांसारख्या शास्त्रज्ञांच्या संशोधनकार्यांची उदाहरणे देत त्यांनी विद्यार्थ्यांना संशोधन हे एक उत्तम करिअर ठरू शकते असे सांगितले. विविध संसाधनांचा उपयोग करून संशोधनाची सुरुवात करता येते असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रश्नोत्तराच्या माध्यमातून मुलांनी हा विषय अधिक सखोलपणे समजून घेण्याचा प्रयत्न केला.

# बालदिनी फुगे फुगवून पुस्तक घराचे उद्घाटन

बालदिनाचे औचित्य साधून पहिली ते चौथीच्या मुलांसाठी आकर्षक पुस्तक घराचे उद्घाटन करण्यात आले. संचालिका व मुख्याध्यापिका सविता नरहरे यांच्या संकल्पनेतील पुस्तक घराचे उद्घाटन स्त्रीरोगतज्ञ डॉ. सुरेखा काळे यांच्या हस्ते फीत कापून, फुगे फुगवून अशा अनोख्या पद्धतीने करण्यात आले. यावेळी पालक प्रतिनिधी संजीवनी देशपांडे पालक समिती सदस्य व पालकांची उपस्थित होती.

मुलांची वाचनाची आवड वाढावी यासाठी नेहमीच वेगवेगळे उपक्रम घेतले जातात.

डॉ. सुरेखा काळे यांनी मुलांना एक छानशी गोष्ट सांगितली. पालकांशी संवाद साधताना त्या म्हणाल्या, "वाचन संस्कार हा लहान वयोगटापासून मिळाला तर ही मुले पुढेही छान वाचतील. मोबाईल, टीव्ही पासून दूर राहतील." संजीवनी देशपांडे यांनी "मुलांना वाचनाची आवड निर्माण करणारी शाळा म्हणजे ज्ञानप्रकाश होय." असे गौरवोद्गार काढले.

पुस्तक घरातील पुस्तकांची मांडणी मुलांना आकर्षित करते म्हणून पुस्तक घरात जाणे, स्वतः आवडीचे पुस्तक निवडणे, मित्रांसोबत बसून वाचन करणे, म्हणजे मुलांसाठी आवडीचा दिवस असतो.

मुलांनी व पालकांनी आपल्या वाढदिवसानिमित्त दिलेल्या पुस्तक भेटीने पुस्तक घर अधिक समृद्ध होत आहे.

# मतदान जागृतीसाठी गृहभेटी आणि परिसर सर्वेक्षण



शिकणे आनंददायी व अर्थपूर्ण व्हावे यासाठी मुलांना वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

महानगरपालिका निवडणुकी-निमित्त मतदान जनजागृती व परिसर सर्वेक्षण करण्यासाठी इयत्ता ४ची मुले परिसरातील घराघरांमध्ये गेली.

मुलांनी नागरिकांना प्रश्न विचारून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यांना मतदान करण्याचे आवाहन केले.

मुलांच्या आत्मविश्वासाचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले.मुलांच्या कायम स्मरणात राहील असा हा सर्वेक्षणाचा दिवस होता यात 120 मुले 350 घरापर्यंत पोचली होती ही विशेष कौतुकाची बाब आहे. मुलांनी सर्वेक्षणात आलेले आपले अनुभव प्रार्थना सभेत सांगितले.

# आपल्याकडे एक तरी कला असावी -ऋत्विक व्यास

"महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका" यांच्याकडून नाट्यलेखनासाठी सन्मानित लातूरचा नाटककार ऋत्विक व्यास याने मुलांशी संवाद साधला.

त्याला बालपणापासूनच गोष्टी ऐकायला आवडायचे, त्यातून त्याला नाटक करावे असे वाटायचे. त्यातूनच त्याला आवड निर्माण झाली आणि पुणे येथे पदवी अभ्यासक्रम घेतला. सध्या तो पुण्यामध्ये एका कंपनीमध्ये काम करत आहे . नाटक लेखन, दिग्दर्शन आणि कलाकार म्हणूनही तो काम करतो. आवड असल्यास कितीही ओढाताण झाली तरी ते काम करताना मजा येते, असे तो म्हणाला. कसं जगायचं ? आणि का जगायचं? हे कला आपल्याला शिकवते. त्यामुळे आपल्याकडे एक तरी कला असावी . ती आपण जतन करावी असेही तो म्हणाला.



सिनेमा व नाटक आणि , प्रायोगिक नाटक व व्यावसायिक नाटक यांमधील फरक ही त्याने सांगितला . प्रश्नोत्तराच्या माध्यमातून ऋत्विक दादाने नाटकाबद्दल अधिक माहिती दिली. शेवटी तो म्हणाला की मला नाट्य क्षेत्राची ही प्रेरणा माझी आई उमाताई व्यास यांच्याकडून मिळाली.

या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना नाट्यकलेविषयी अधिक माहिती मिळाली व त्यांच्या अभिनय कौशल्याला नवी दिशा मिळाली. विविध स्पर्धांत भाग घेणाऱ्या, नाट्य , संगीताची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आज ही विशेष भेट होती .

# यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

**ज्ञानप्रकाश टॅलेंट सर्च परीक्षा**

*इयत्ता ३ री*
१) गार्गी उगिले (प्रथम)
२) श्रेयश गाडीकर (द्वितीय)
३) अर्णव डिग्गे ( तृतीय )

*इयत्ता ४थी*
१) अद्वय हौसे (प्रथम)
२) मुग्धा दुवे(द्वितीय)
३) श्री राज साळुंके ( तृतीय )

*इयत्ता ५वी*
१) अर्णव बस्तापुरे(प्रथम)
२) उत्कर्ष शेळके(द्वितीय)
३) साक्षी जनवाडे ( तृतीय )

**जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा**
१) अनिरुद्ध हुमनाबादे
२) सार्थक लाखोटे

**सातारा सैनिक स्कूल प्रवेश परीक्षा**
१) अर्णव बस्तापुरे

**भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा**
१) अवनिश नरहरे (७वी) गोल्ड मेडल
२) अर्णव बस्तापुरे (५वी) ब्राँझ मेडल
३) हनुमंत कुलकर्णी (६वी) सिल्वर मेडल

**दिव्य मराठी राज्यस्तरीय ज्युनिअर एडिटर स्पर्धा**
१) अभिनव औताडे(६वी)
२) संस्कार वळसंगे (८वी)

राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन
१) आरुष शेळके (७वी)

**मराठवाडास्तरीय वादविवाद स्पर्धा**
१) माधवी जायभाये (द्वितीय)
२) वैदेही पाटील (द्वितीय)

**हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा**
1) अनुष्का पुणेकर - विभागात पहिली

**महात्मा गांधी राजभाषा परीक्षा गौरव पुरस्कार प्राप्त - 7 विद्यार्थी**

**इंडियन टॅलेंट ऑलंपियाड परीक्षा**

* **इंटरनॅशनल ड्रॉइंग ऑलंपियाड**
अक्षरा पत्तेवार-राज्यात 21 वी
* **नॅशनल हिंदी ऑलंपियाड**
ती सूर्यवंशी-राज्यात 25 वी
* **इंटरनॅशनल इंग्लिश ऑलंपियाड**
विनया गोमसाळे
* **इंटरनॅशनल सायन्स ऑलंपियाड**
१)विश्वजीत कैले
२)अनन्या गायकवाड
* **सायन्स ऑलंपियाड फाउंडेशनमध्ये 15 विद्यार्थ्यांची दुसऱ्या फेरीसाठी निवड**
* **इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ऑलंपियाडमध्ये १२ विद्यार्थ्यांची निवड**
* **मॅथ्स अँड सायन्स ॲबिलिटी टेस्ट दुसऱ्या फेरीसाठी निवड**
चि.विश्वजीत कैले (इ.7 वी)

**किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप**
अक्षरा भुजबळ (८वी) गोल्ड मेडल

**एलिमेंट्री (A ग्रेड)**
१) आलोक शेळके
२) असीम मुलानी
३) अथर्व वाघमारे
४) सृष्टी कुलकर्णी
५) विश्वजीत कैले

**इंटरमीडिएट (A ग्रेड)**
१) अक्षरा पत्तेवार
२) अंश वाघमारे
३) माहेश्वरी हमने
४) वैदेही पाटील

# ज्ञानप्रकाश संगीत विद्यालयाचे यश

आखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई, द्वारा संलग्नित, ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प द्वारा संचलित ज्ञानप्रकाश संगीत विद्यालयात मागील ९ वर्षांपासून प्रारंभिक ते मध्यमापूर्ण परीक्षेला मुले बसतात. या मुलांना मयूर दादा मार्गदर्शन करतो.

यावर्षी नोव्हेंबर/डिसेंबर २०२५ च्या सत्रात २७० मुलांनी परीक्षा दिली. विशेष योग्यतेसह उत्तीर्ण झालेल्या मुलांमध्ये १०७ मुलांनी विशेष प्राविण्य व ११३ मुलांनी प्रथम श्रेणीत यश संपादन केले. प्रकल्प प्रमुख नरहरे सरांनी मुलांचे अभिनंदन केले.


इयत्ता तिसरीची रेल्वे स्टेशन भेट


गणित प्रज्ञा परीक्षेस पात्र इ.५ वी व ८ वी चे विद्यार्थी


गांडूळखत निर्मिती प्रक्रिया समजून घेताना


उन्हाळी सुट्टीपुर्वी भिजण्याचा आनंद घेताना


बालरंगभूमी मुंबई द्वारा आयोजित स्पर्धेत मिळवली बक्षिसे


नागपूर येथे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात ज्ञानप्रकाशचा आरूष शेळके


बाल दिनानिमित्त पुस्तक घराचा उद्घाटन प्रसंगी शुभेच्छा देताना नरहरे सर


फलकावरील चित्र समजून घेताना...


पुस्तक घरात पुस्तक वाचण्याचा आनंद न्यारा


पालक श्री फुंदे यांनी मुलांसाठी पाठवले टरबूज


पर्यावरणपूरक कामाबद्दल राष्ट्रीय हरीत योजना कडून सन्मान


प्रकल्प दर्शनाची पाहणी करताना नरहरे मॅडम यांचे आई व बाबा


सायलेंट रिडिंग उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी


प्रकल्प प्रदर्शनात रक्त दान करताना पालक


मराठवाडा स्तरीय वादविवाद स्पर्धेत माधवी जायभाये व वैदेही पाटील यांचा दुसरा क्रमांक


वेळामावस्या सण यशस्वी करणारी महिला पालक समिती


हिवाळी थंडीत ८वीच्या विद्यार्थ्यांचा सर्वांना गरम गरम चहा


नाट्यलेखक, दिग्दर्शक, कलाकार ऋत्विक व्यास सोबत संवाद


नरहरे क्लासेस (गणित) लातूर

गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे ३६ वे वर्ष

नरहरे क्लासेस

प्रवेश प्रक्रिया १ मे पासून...

संचालक : सतीश नरहरे

8th, 9th, 10th Maths 8th CBSE Maths Batches 5th to 7th Semi English

ज्ञानप्रकाश इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, नरहरे क्लासेस, लातूर. फोन : ०२३८२-२२०५१८, २२४५११, २२४३१४